**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# आचार्य पदवीधारक संशोधकांना मौखीक परीक्षेच्या दिवशीच अधिसूचना प्रदान होणार

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आचार्य पदवीसाठी संशोधन करणाऱ्या संशोधनकर्त्यांची मौखीक परीक्षा झाल्यानंतर त्याचदिवशी आचार्य पदवी प्रदान करण्यासंबंधी अधिसूचना प्रदान केली जाणार आहे. बोर्ड ऑफ डीन्स ने याबाबतचा निर्णय घेतला असून तशी सुधारणा संबंधित अध्यादेशामध्ये करण्यात आली आहे.

कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी यासाठी पुढाकार घेवून मौखीक परीक्षेच्या दिवशीच अधिसूचना प्रदान करण्याच्या सूचना केल्या होत्या, त्यानुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी प्राधिकारिणींच्या निर्णयानुसार प्रक्रीयेत सुधारणा करुन आचार्य पदवीसाठी संशोधन पूर्ण करणाऱ्या संशोधकाला मौखीक परीक्षेच्या दिवशी अधिसूचना प्रदान केल्या जात आहे. पहिल्यांदा श्री दिनेश जरोन्डे या संशोधक विद्यार्थ्याला डॉ. हेमंत देशमुख यांचे शुभहस्ते अधिसूचना प्रदान करण्यात आली. बहुदा हा उपक्रम महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये अमरावतीतच असावा. यासाठी आचार्य पदवी विभागाचे सहा. कुलसचिव श्री सुजय बंड व त्या विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतलेत.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २३/०२/२०२०.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी